# क्रांतिसिंह नाना पाटील

(दि. ३ ऑगस्ट, १९०० - ६ डिसेंबर, १९७६)

(अल्प परिचय)

महाराष्ट्रातील एक देशभक्त, झुंझार नेते आणि क्रांतिसिंह म्हणून ते ओळखले जातात. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील येडे मचिंद्र या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात झाला. नानांचे वडील रामचंद्र हे गावचे पाटील होते. नानांचे प्राथमिक शिक्षण गावी झाले आणि ते मुलकी परीक्षा उत्तीर्ण झाले (१९१६). यानंतर त्यांना तलाठ्याची नोकरी मिळाली. पुढे सत्यशोधक चळवळीकडे ते आकर्षित झाले. त्यांनी ग्रामीण भागातून दौरे काढून तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा, हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथा व चालीरीती यांविरुद्ध लोकमत जागृत केले. अनेक अनिष्ट चालीरीतींविरुद्ध त्यांनी बंड पुकारले.

सातारा जिल्ह्यात काही सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी “प्रतिसरकार” स्थापन केले व ब्रिटिश शासन पाडण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. सरकारी बँका, पोस्ट व तारखाते, पोलीस ठाणी यांवर छापे घातले. सरकार तर्फे हेरगिरी करणाऱ्यास तसेच जबरीने शेतसारा वसूल करणाऱ्या पाटील-तलाठ्यांच्या पायांवर काठीचे तडाके मारण्यात येत. यावरून त्यांच्या या प्रतिसरकारला “पत्रीसरकार” हे नाव रूढ झाले होते. ब्रिटिश सरकारने नाना पाटलांना पकडून देणाऱ्यास दहा हजार रुपयांचे बक्षीसही जाहीर केले.

या आंदोलन काळातच नानांनी “ग्रामराज्या”ची स्थापना करण्याचे कार्य हाती घेतले. खेड्यातील परकी सत्ता नामशेष करून त्यांना स्वयंपूर्ण बनवावे व त्यांचा सर्व कारभार ग्रामस्थांच्या हाती द्यावा, लोकनियुक्त पंचांनी खेड्याचा कारभार पहावा व आवश्यक वाटल्यास भूमिगतांनी त्यांना मदत करावी, अशी एकूण ग्रामराज्याची कार्यपद्धती होती. कराड, वाळवे, तासगाव इ. ठिकाणी “पंचसभा” स्थापन झाल्या. “न्यायदान समित्या”ही स्थापन करण्यात आल्या.

नाना पाटील प्रभावी वक्ते म्हणून प्रसिद्ध होते. अज्ञानी, दुर्बल घटकांचे त्यांनी खंबीरपणे नेतृत्व केले. सशस्त्र क्रांतिमार्गाने ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. जनसेवा व देशसेवा हे त्यांचे जीवितकार्य होते. सत्यशोधक चळवळ, भारतीय स्वातंत्र्यसंग्राम, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन या सर्वांचे महाराष्ट्रात नाना पाटलांनी नेतृत्व केले. मिरज येथे त्यांचे निधन झाले.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)